CMYK

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांनी चक्क जिल्हा परिषद सीईओंच्या दालना बाहेर भरवली शाळा
>> पान 2

लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही
>> पान 3

आज जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'एक पेड माँ के नाम' मोहीम
>> पान 4


**सुविचार**
जीवनात नेहमी पुढे जाण्याचा प्रयत्न करा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 07 ■ शनिवार, दि. 26 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



उज्वल निकम यांच्या बायोपिकमध्ये अभिनेता राजकुमार राव झळकणार

आतील पान

# महायुतीतील आठ मंत्र्यांना नारळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महायुती सरकारमधील तब्बल आठ मंत्र्यांना नारळ दिला जाणार असल्याचा सनसनाटी दावा शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या सामनामधून करण्यात आला आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नाराज मंत्र्यांना धक्कातंत्र देण्याच्या तयारीत असल्याचे हि सामनात म्हटले आहे. दारम्यान, विधानसभा अध्यक्ष राहून नार्वेकर यांना मंत्रीपदी संधी मिळणार असल्याचेही सामनामध्ये म्हटले आहे. त्यांच्या जागी गेल्या काही दिवसांपासून सरकार विरोधातच भूमिका घेतलेल्या माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिपदी विधानसभा अध्यक्षपदी संधी दिली जाईल, असाही दावा हि सामनामध्ये करण्यात आला आहे.**

## सुधीरभाऊंची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी?



दरम्यान, आता याच मुद्यांवरून राजकीय वर्तुळात अनेक उलट सुलट चर्चा रंगत असताना शिवसेना नेते संजय राऊत यांनी मंत्रिमंडळातील फेरबदलाबाबत केलेल्या वक्तव्यावर स्व:ता भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. अशी कुठलीही चर्चा कोर कमेटी ग्रुपमध्ये झालेली नाही. मंत्रीमंडळा बाबतचा कुठलाही निर्णय राज्यस्तरावर होत नाही, तो केंद्रीय स्तरावर होत असतो. त्यामुळे अशा प्रकारच्या काही बदल होणार असेल तर तो वेळेवर कळतो. पण सध्या असा काही बदल होईल अशा मला वैयक्तिकरित्या वाटत नाही. अशी प्रतिक्रिया भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

दुसरीकडे, विधानसभा अध्यक्ष पदाबद्दल मला सध्या काही माहीत नाही, पण सध्या असा काही फेरबदल होईल असं मला वैयक्तिकरित्या वाटत नाही. पुढे नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत. त्यामुळे त्या त्या जिल्ह्यातील नेत्यांना मंत्रिपदावरून अस्थिर करण्याचं काम होणार नाही, असं मला वाटतं. असेही आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

या सर्व पार्श्र्वभूमीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याशी एबीपी माझाने संवाद साधला. यावेळी बोलताना राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, माध्यमांमधील बातम्यांवर आपला विश्र्वास नसून पक्षाच्या नेतृत्वावर विश्र्वास आहे.त्यांनी पुढे सांगितले की पक्ष देईल ती जबाबदारी मी स्वीकारण्यासाठी तयार असून जी पक्षाची इच्छा असेल ती माझी इच्छा असेल, असे त्यांनी सांगितले. मंत्र्यांना डच्चू देणार आहे त्या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सगळे चांगले काम करत आहेत. मात्र पक्षाचा निर्णय सर्वांना मान्य असेल असे ते म्हणाले.

## अजितदादांनी दोन दिवस मागितलेत, कोकाटेंच्या राजीनाम्याची अपेक्षा



**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सूरज चव्हाण यांनी मारहाण केल्याप्रकरणी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाटगे यांनी आज उपमुख्यंमत्री अजित पवार यांची पुण्यात भेट घेतली. अजित पवारांची भेट घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. जे झालं ते अत्यंत चुकीचं झालं असं दादांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रातील राजकारणात असं व्हायला नाही पाहिजे. आरोपीवर किरकोळ गुन्हे दाखल केले आहेत, तक काहींना सोडून दिले, यावर अजित पवार हे स्वत: लातूर पोलिसांशी बोलले, हे खपवून घेतलं जाणार नाही असं स्पष्ट त्यांनी सांगितल्याचे विजय घाडगे म्हणाले. अजितदादांनी दोन दिवसांची वेळ मागितली आहे. त्यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा न घेतल्यास आंदोलन करणार असल्याचा अशारा घाडगे यांनी दिला आहे.

## पंतप्रधान मोदींच्या 'गडा'ला राहुल गांधी देणार भेट; गुजरातमधील प्रशिक्षण शिबिराला करणार संबोधित



अहमदाबाद : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे २६ जुलै रोजी गुजरात दौरा करणार आहेत. गुजरात काँग्रेसचे अध्यक्ष अमित चावडा यांनी गुरुवारी याबाबतची माहिती दिली. राहुल गांधी यांचं २६ जुलैला सकाळी वडोदरा विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर आणंद इथं आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात ते सहभागी होतील. पक्ष २०२५ हे संघटन वर्ष म्हणून साजरं करत आहे. त्यासाठी आणंद इथं एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे, अशी माहितीही अमित चावडा यांनी यावेळी दिली.

राहुल गांधी जाणार गुजरात दौऱ्यावर : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे गुजरातला भेट देणार आहेत. यावेळी राहुल गांधी यांचं २६ जुलैला सकाळी वडोदरा विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर आणंद इथं आयोजित प्रशिक्षण शिबिरात राहुल गांधी सहभागी होतील. अखिल भारतीय काँग्रेस समिती २०२५ हे वर्ष संघटनात्मक उत्सव म्हणून साजरं करत आहे. त्याम ुळे आणंद शहरात तीन दिवसीय काँग्रेस प्रशिक्षण शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. राहुल गांधी २६ जुलैला या शिबिरात सहभागी होणार आहेत. गुजरातचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष अमित चावडा यांनी वडोदरा इथं राहुल गांधींच्या गुजरात दौऱ्याची घोषणा केली आहे.

काय म्हणाले अमित चावडा : राहुल गांधी यांनी गुजरातमधील अरवली जिल्ह्यातील मोडासा इथं 'सतनगर सृजन अभियान' सुरू केलं. या अभियानाचा उद्देश जिल्हा काँग्रेस समित्यांना सक्षम करून पक्ष संघटना मजबूत करणं आणि जबाबदारीची एक नवीन प्रणाली सुरू करणं हा आहे. काँग्रेस पक्षानं अहमदाबादमध्ये दोन दिवसांचं राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केलं आहे. भाजपशी 'हातमिळवणी' करणाऱ्या काही पदाधिकाऱ्यांना पक्षातून काढून टाकण्याची गरज आहे, असं राहुल गांधी यांनी यापूर्वी गुजरातमधील काँग्रेस कार्यकर्त्यांना बजावलं आहे.

काँग्रेसमधील भाजपा समर्थकांवर कठोर कारवाई करा : विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावेळी काँग्रेस नेत्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. आपल्याला यश मिळवायचं असेल, तर अगोदर दोन गोष्टी कराव्या लागतील. यात एक काँग्रेसम धील निष्ठावान आणि भाजपा समर्थक वेगळे करावे लागतील. काँग्रेसमधील भाजपा समर्थकांवर कठोर कारवाई करावी लागेल, असं त्यांनी बजावलं आहे. त्यासाठी आपल्याला दहा, पंधरा, वीस किंवा तीस लोकांना काढून टाकावं लागलं, तरी आपण त्यांना काढून टाकलं पाहिजे, असंही त्यांनी यावेळी बजावलं. या दौऱ्यात राहुल गांधी हे गुजरातमधील राजकीय परिस्थिती आणि पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर देण्यासाठी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सलग पाचव्या दिवशी बिहार व्होटर व्हेरिफिकेशनवरून

## इंडिया आघाडीचा एल्गार

### संसदेच्या प्रांगणात यादीची चिरफाड करत केराची टोपली दाखवली







नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी, बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावर संसदेच्या आवारात विरोधकांनी निदर्शने केली. विरोधी पक्षाच्या खासदारांनी गांधी पुतळ्यापासून मकर द्वार (नवीन संसद इमारतीचे प्रवेशद्वार) पर्यंत मोर्चा काढला. राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनीही त्यात भाग घेतला. मकर द्वार येथे पोहोचताच, राहुल-प्रियांका यांच्यासह विरोधी पक्षाच्या खासदारांनी विशेष गहन सुधारणा लिहिलेले पोस्टर फाडले. त्यांनी ते एका प्रतीकात्मक कचऱ्याच्या डब्यात फेकले. त्यांनी मोदी सरकार पाडण्याचे घोषणाही दिले.

लोकसभेतही विरोधकांनी घोषणाबाजी केली. सभापती ओम बिर्ला यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली. २८ जुलैपासून सभागृह सुरळीत चालविण्यावर एकमत झाले आहे. त्याच दिवशी ऑपरेशन सिंदूरवरही चर्चा केली जाईल.

राज्यसभेचे नेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ते (केंद्र) गरिबांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवू इच्छितात आणि फक्त उच्चभ्रू वर्गाला मतदान करू देऊ इच्छितात. ते (केंद्र सरकार) संविधानाचे पालन करत नाहीत. डखठ विरुद्ध आमचा लढा सुरूच राहील.

सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच सर्व खासदारांनी कारगिलमधील शहीदांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर विरोधकांनी बिहार मतदार पडताळणीवरून गोंधळ घातला. पाच मिनिटांनी सभागृहाचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

राज्यसभेत सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाले आणि सुमारे २० मिनिटे चालले. त्यानंतर दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. पुन्हा कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी गोंधळ घातला. त्यानंतर सभागृह २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

## शाळेचं छत कोसळून चार विद्यार्थ्यांचा मृत्यू, राजस्थानातील भीषण दुर्घटना

झालावाड : राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात शुक्रवार (दि. २५ जुलै) रोजी सकाळी एक मोठी दुर्घटना घडली. मनोहरथाना ब्लॉकमधील पिपलोदी गावात असलेल्या राजकीय उच्च प्राथमिक विद्यालयाची छत अचानक कोसळले आणि त्यानंतर शाळेची भिंत देखील पडली. या दुर्घटनेत आतापर्यंत चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर अनेक विद्यार्थी अजूनही ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी या दुर्घटनेत तीन विद्यार्थ्यांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा करून बचाव आणि मदतकार्य वेगाने पार पाडण्याचे तसेच जखमी विद्यार्थ्यांच्या उपचारासाठी योग्य ती व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. झालावाडचे पोलीस अधीक्षक अमित कुमार यांनी सांगितले की, शाळेचे छत कोसळून ३ ते ४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच झालावाडचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक अमित कुमार बुडानिया घटनास्थळी रवाना झाले आहेत. सध्या जेसीबी मशिनच्या सहाय्याने ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे. जखमी विद्यार्थ्यांना मनोहरथाना येथील आरोग्य केंद्रात (उडउ) दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी उपस्थित असलेले स्थानिक ग्रामस्थ देखील प्रशासनासोबत मिळून बचावकार्यात मदत करत आहेत.

अपघाताच्या वेळी शाळेमध्ये अनेक विद्यार्थी उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, छत अचानक कोसळली आणि त्याखाली सुमारे ६० हून अधिक विद्यार्थी अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या भीषण घटनेची तीव्रता लक्षात घेता मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य अधिक वेगात सुरू केले आहे.

## एचआयव्ही बाधित मुलीवर लैंगिक अत्याचार, ६ जणांवर गुन्हा दाखल, महाराष्ट्राला हादरवणारी घटना!

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील एका नामांकित संस्थेत एचआयव्ही बाधित अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात एकूण सहा जणांना आरोपी करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, यापूर्वी मुलीचा लातूर शहरातील एका नामांकित रुग्णालयात गर्भपात केल्याचंही तपासात उघड झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही मूळची धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी आहे. तिच्यावर अत्याचार झाल्यानंतर तिने ढोकी पोलिसांत फिर्याद दाखल केली. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीनुसार, बाल लैंगिक अत्याचारासह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. मुलीने दिलेल्या जबाबात, तिच्यासह आणखी काही मुलींवर अत्याचार झाल्याचं देखील नमूद केलं आहे. त्याम ुळे खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात संस्थेचे दोन डायरेक्टर, अत्याचार करणारा मुख्य आरोपी, तसेच मुलींनी लेखी तक्रार केली असता, ती तक्रार पेटीत टाकून भांडणाऱ्या एका कर्मचाऱ्यालाही आरोपी करण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा गुन्हा ढोकी पोलीस ठाण्यात दाखल असला तरी, घटनेचे गांभीर्य आणि कार्यक्षेत्र लक्षात घेता तो औसा पोलीस ठाण्याकडे वर्ग (रेफर) करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे समाजात संतापाची लाट उसळली असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.


## समृद्धी महामार्गामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर समृद्धी महामार्ग लगत डोणगाव भाग दोन येथील शेतकऱ्यांचे समृद्धी महामार्गाच्या पाण्याच्या अतिप्रवाहामुळे तसेच पूर्वी पासून असलेले अनेक छोटे मोठे नाले यांचा प्रवाह मार्ग बदलून एकाच नाल्यामध्ये पाणी मिळवून दिल्यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी व त्यातील पिके खरडून गेलेली आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सदरील समृद्धी लगत २७० चैनल नंबर जवळ असलेल्या नाल्याच्या कामाचे व्यवस्थानाबद्दल डोणगाव येथील शेतकरी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा ,तहसील कार्यालय मेहकर, मुख्य कार्यकारी अभियंता एमएसआरडीसी कार्यालय मेहकर, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापराव जाधव तसेच मेहकर विधानसभा आमदार सिद्धार्थ खरात यांना झालेल्या नुकसानीचे निवेदन दिले तसेच नुकसान भरपाई सह नाल्याच्या रुंदीकरण व खोलीकरण करून देण्याची मागणी केली गेली आहे.

### समृद्धी महामार्गावरून शेतात येणाऱ्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करा शेतकऱ्यांचे अधिकाऱ्यांना निवेदन





CMYK

## व्रत वैकल्याचा महिना श्रावण

काल म्हणजे शुक्रवारपासून श्रावण महिना सुरु झाला. हिंदू धर्मात श्रावण महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. श्रावण महिन्यातील सोमवार हिंदू धर्मात पवित्र मानला जातो. या दिवशी महादेवाची पूजा केली जाते. तसे श्रावण महिन्यातील प्रत्येक वारी कोणत्या ना कोणत्या देवतेची पूजा व व्रत करण्याची हिंदू व जैन धर्माची परंपरा आहे. श्रावण महिन्याला सणांचा महिना म्हंटले जाते. कारण श्रावण महिन्यातच सर्वात जास्त सण येतात. या महिन्यात व्रत वैकल्याची रेलचेल असते. श्रावण महिन्यात नाग पंचमी, रक्षा बंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, बैल पोळा हे सण येतात. त्यानंतर येणारे गौरी गणपतीही याच महिन्यात खुणावत असतात. नाग पंचमी पासून दसरा दिवाळी पर्यंत सगळ्या हव्या हव्याशा सणांची सुरुवात याच महिन्यापासून होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत घराघरात असतो. श्रावणातील प्रत्येक दिवस सण होऊन जातो. अशा आनंदी वातावणामुळे असेल कदाचित पण श्रावणात मनाच्या सांदी कोपऱ्यात उत्साहाचे नवे ऋतू फुलत असतात. बहुतेक सगळ्या सणामध्ये आणि अंगिकारल्या जाणाऱ्या व्रत वैकल्यांमधून संकटातून निर्भिडपणे आणि यशस्वीपणे बाहेर येण्यासाठी शक्ती मिळवण्यासाठी प्रेरणा मिळते. संसारातील सर्व सुख दुःखाचा सारीपाट मांडला असताना मन मोकळं करून सख्याना समजून घेण्याचे हक्काचे क्षण हा महिना देऊन जातो. श्रावण महिना केवळ हिंदुसाठीच नव्हे तर मुस्लिम आणि पारशी बांधवांसाठी ही पवित्र महिना मानला जातो कारण याच महिन्यात मुस्लिमांची बकरी ईद आणि पारशी बांधवांची पतेती हे सण येतात. त्यामुळे हिंदू प्रमाणेच जैन, मुस्लिम आणि पारशी बांधव श्रावण महिन्याची आतुरतेने वाट पाहत असतात. मुस्लिम आणि पारशी बांधव देखील त्यांचे सण उत्साहात आणि जल्लोषात साजरे करतात. श्रावण महिन्यात निसर्गाला उधाण आलेले असते. आषाढ महिन्यात झालेला पावसाने सर्वत्र हिरवळ दाटलेली असते. निसर्ग आषाढ सरी पिऊन हिरवे गालिचे पसरून बहरलेला असतो. हा हिरवा गालिचा पाहूनच हिरवे हिरवेगार गालिचे हरित तृणाच्या मखमालीवर.... ही कविता बालकवींना सुचली असावी. श्रावण महिन्यात सगळीकडे वसुंधरेवर श्रावणाच्या धारा बरसत असतात. श्रावणाच्या धारा बरसत असल्याने निसर्ग सौंदर्य तृप्तीचा हुंकार देत असतो. निसर्गाचे बहरलेले सौंदर्य पाहताच हासरा, नाचरा, लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला या ओळी ओठी गुणगुणावश्या वाटतात. श्रावण म्हणजे चैतन्य..... श्रावण म्हणजे उत्साह..... श्रावण मासी हर्ष मानसी .. हिरवळ दाटे चोहिकडे .. क्षणात येते सरसर शिरवे .. क्षणात फिरून उन पडे .. या कवितेत बालकवींनी श्रावण महिन्याचे चित्रण यथार्थपणे मांडले आहे.

# शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांनी चक्क जिल्हा परिषद सीईओंच्या दालना बाहेर भरवली शाळा

## दोन वर्षांपासून शिक्षकांची पदे रिक्त : विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

**दैनिक आपला विदर्भ**

**चिखली/प्रतिनिधी :** तालुक्यातील अमोना येथील जिल्हा परिषद शाळेवर गेल्या दोन वर्षांपासून शिक्षकांची पदे रिक्त आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होत आहे, वारंवार शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून देखील शिक्षक मिळत नसल्याने संतप्त झालेल्या पालक आणि विद्यार्थ्यांनी थेट जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालना बाहेरच शाळा भरविली.जोपर्यंत शिक्षक मिळत नाही तोपर्यंत याच ठिकाणी शाळा भरविणार असल्याचा पवित्रा विद्यार्थ्यांसह पालकांनी घेतला आहे. अशी माहिती अमोना येथील शाळा समिती





अध्यक्ष गजानन इंगळे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी शासनाच्या वतीने विविध योजना राबवत कोट्यावधी रुपयाचा खर्च केला जात आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोडी लागण्यासाठी विद्यार्थ्यांना खिचडी, अंडी, केळी, चॉकलेट आदी पौष्टिक आहार दिला जात आहे यावरही प्रचंड खर्च शासनाचा होत आहे.त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला पुस्तक बुट, ड्रेस देऊन विद्यार्थ्यांना शाळेमध्ये येण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एका विद्यार्थ्यावर हजारो रुपयांचा खर्च शासन एकीकडे करीत आहेत. तर दुसरीकडे जिल्हा परिषद शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक हानी होत आहे. असे विदारक चित्र ग्रामीण भागात दिसून येत असून असाच काहीसा प्रकार तालुक्यातील अमोना येथे गत दोन वर्षांपासून सुरू आहे.अमोल येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गत दोन वर्षापासून शिक्षक नसल्याने पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले. आहे रिक्त जागांवर शिक्षकांची भरती करावी यासाठी अमोना येतील ग्रामस्थ शाळा व्यवस्थापन समिती च्या वतीने बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे वारंवार निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.मात्र, सदर मागणीची दखल न घेता त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. वारंवार मागणी केल्यानंतरही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने संतप झालेल्या शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने आक्रमक भूमिका घेत बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालना बाहेर शाळा भरून रिक्त जागांवर शिक्षकांची तत्काळ नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

## नवी मुंबईमध्ये रिक्षा चोरी करून फरार झालेल्या आरोपींना जालनामधून पोलिसांनी केली अटक

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईमध्ये गेल्या काही महिन्यांपासून रिक्षा चोरीचे प्रकार घडत होते. या संदर्भात चौकशी केली असता एकूण १२ रिक्षा चोरी झाल्याचे समजत आहे. यामध्ये बेलापूर खारघर कळंबोली पनवेल या ठिकाणच्या रिक्षा चोरी करून जालन्यामध्ये विविध ठिकाणी विकल्या गेल्या आहेत. या संदर्भात बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता नवी मुंबई पोलिसांनी अधिक चौकशी केली असता दोन्ही आरोपींना अटक केली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून हे दोन्ही आरोपी चोरी करत होते. सध्या आरोपींकडून सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्याचबरोबर आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे.



# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष : गोर–गरीब, गरजू रुग्णांसाठी संजीवनी

विजय राऊत
सहायक संचालक (माहिती)

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाद्वारे अमरावती विभागातील गरजूंना ६ कोटी ८२ लाखांची मदत

राज्यभरासह अमरावती विभागातील गरजू रुग्णांना अडचणींच्या प्रसंगी मदतीचा हात देत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. राज्यातील हजारो गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांच्या दुर्धर आजारावर तातडीने उपचार होण्यासाठी अत्यंत आवश्यक आर्थिक मदत पुरवून या निधीने आरोग्य सेवेप्रती आपली बांधिलकी दर्शविली आहे. गत सहा महिन्यात म्हणजे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती विभागांतर्गत येणाऱ्या पाचही जिल्ह्यातील या कक्षाद्वारे ७६३ गरजू व पात्र रुग्णांना गंभीर व दुर्धर आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी एकूण ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले, ज्यामुळे असंख्य जीव वाचले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष महत्त्वाचे ठरले आहे. सहाय्यता निधी प्राप्त करण्याकरिता संबंधित रुग्णांच्या नातेवाईकांना मुंबई येथे अर्ज सादर करण्यासाठी जावे लागत असे, त्यात बऱ्याच अडचणीही येत असत. ही अडचण दूर करुन गोर–गरीब रुग्णांना त्यांच्या स्वजिल्ह्यातच हे अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष स्थापित करण्यात आला आहे. गरजूंना तसेच सामान्य जनतेला म ार्गदर्शन व तत्काळ मदत उपलब्ध




करुन देण्यासाठी डॉक्टराची नोडल ऑफीसर म्हणून या कक्षात नेमणूक करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, मदत कक्षाच्या कार्यालयात आलेला एकही रुग्ण म दतीविना वंचित राहू नये, या तत्त्वावर कक्षाचे काम सुरू आहे. याच प्रयत्नांम ुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशिम या पाचही जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून उत्तम रुग्णसेवेचे कार्य सुरू असून अनेक रुग्णांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

जानेवारी ते जून २०२५ पर्यत ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांची मदत

अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाद्वारे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील १७३ रुग्णांना १ कोटी ६९ लाख १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले. अकोला जिल्ह्यातील ४० रुग्णांना ३० लाख ३० हजार रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यातील ८६ रुग्णांना ७९ लाख ८२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. बुलडाणा जिल्ह्यातील ३४८ रुग्णांना २ कोटी ८९ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. तर वाशिम जिल्ह्यातील ११६ रुग्णांना १ कोटी १४ लाख ६० हजार रुपयांची वैद्यकीय मदत वितरीत करण्यात आली आहे.

असा आहे उपक्रम

महाराष्ट्रातील गरजू व पात्र रूग्णांना वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक मदतीचा हातभार लावण्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने सुरू केलेला हा लोकोपयोगी व महत्वाकांक्षी उपक्रम आहे.

योजनेसाठी पात्रता व निकष

या उपक्रमाचा लाभ घेण्याकरिता अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा लागतो. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १.६० लाखांच्या आत असणे आवश्यक आहे. रूग्णाकडे रेशन कार्ड व आधार कार्ड असणेही गरजेचे आहे. उपचार घेत असलेले रूग्णालय महाराष्ट्र राज्यामधील असणे आवश्यक असून रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक असते.

अर्थसहाय्य मिळू शकणारे आजार

या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत काही ठराविक आजार चिन्हीत करण्यात आले आहे. यामध्ये कॉकलियर ईम्प्लांट अंतस्त कर्णरोपण शस्त्रक्रिया (वय २ ते ६ वर्षापर्यत), हृदययकृतकिडणीफुप्फुसबोन मॅरो आणि हाताचे प्रत्यारोपण, कर्करोगरस्ते अपघातलहान बालकांची शस्त्रक्रियाम ेंदुरोग हृदयरोग आणि हिप रिप्लेसम ेंट सर्जरी यासह डायलिसिसकेम ोथेरेपीरेडिएशननवजात शिशुंचे आजारगुडघ्याचे प्रत्यारोपणभाजलेले रूग्णअस्थीबंधन आणि विद्युत अपघात आदी आजारांचा समावेश होतो.

योजनेच्या लाभासाठी आवश्यक कागदपत्रे

वैद्यकीय सहाय्यता मदत कक्षाकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज, वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रकाची मूळप्रत, डॉक्टरांच्या सही व शिक्यासह (खाजगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून प्रमाणीत करणे आवश्यक आहे), तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (रु. १ लाख ६० हजार पेक्षा कमी), रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे)नवजात बाळासाठी आईचे आधारकार्ड आवश्यक आहे, रुग्णाचे रेशन कार्ड (महाराष्ट्र राज्याचे), संबधीत आजाराचे रिपोर्ट (ईन्व्हेस्टिगेशन रिपोर्टस) असणे आवश्यक, रुग्णाचा पासपोर्ट फोटो, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी शासकीय समि तीची मान्यता आवश्यक आहे, रस्ते अपघात असल्यास एफआयआरची प्रत जोडणे आवश्यक आहे.

असा करता येईल अर्ज

या उपक्रमांतर्गत अर्थसहाय्य प्राप्त मिळविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. विहीत नमुन्यात मुळ अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना https://cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

लाभासाठी रूग्णालयाची अट

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी रूगणालय हे नोंदणीकृत असणे गरजेचे असून संबंधित रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक आहे. रूग्णालयामध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनाआयुष्यमान भारत योजनाधर्मदाय रूग्णालयआरबीएसके इत्यादी योजना कार्यान्वीत असल्यास या योजनांमधून रूग्णाचा उपचार होणे बंधनकारक आहे व रूग्णाचा आजार या योजनेमध्ये बसत नसल्यास तसे प्रमाणपत्र खर्चाच्या अंदाजपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच रुग्णाला डिस्चार्ज होण्याच्या पूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

किती रकमेपर्यत मिळू शकते मदत

रूग्णाच्या आजाराचे व उपचाराचे स्वरूप, इन्व्हेस्टीगेशन रिपोर्ट याचे अवलोकन करून कार्यकारिणी समि ती नियमाप्रमाणे निर्णय घेत जास्तीत जास्त २ लाखांचे अर्थसहाय्य हृदययकृतकिडणीफुप्फुस आणि बोन मॅरो प्रत्यारोपणाकरिता करण्यात येते.

गरजू व गरीब नागरिकांना गंभीर, दुर्धर आजाराच्यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाद्वारे देण्यात येणारी मदत बहुमोलाची ठरत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाकडून गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळावी, यासाठी राज्यातील सर्व मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रयत्नशील असतात, अशी माहिती मुंबई मंत्रालय येथील राज्यातील सर्व सहाय्यता कक्षाचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिली. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या म ार्गदर्शनातून जिल्हास्तरावर सहाय्यता कक्ष उपलब्ध झाल्याने अनेक गोर–गरीब, गरजू रुग्णांना दिलासा मिळाला आहे. अधिकाधिक गरजूंपर्यत हा लाभ पोहचावा या उद्देशाने मुख्यमंत्री कार्यालयही या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. कठीण प्रसंगी मुख्यमंत्री कार्यालय सर्वसाम ान्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याने, त्यांच्या चेहऱ्यावर सम ाधान दिसून येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पैसे डबल करायला २० लाख दिले, पैसे घेऊन भोंदू बाबा फरार



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** एका मध्यस्ती मित्राने पैसे डबल करून देणारा एक बाबा असल्याचे सांगून, आपल्या घरी तो येणार आहे, डबल पैशांच्या लालसे पोटी मित्र २० लाखांची रक्कम घेऊन मित्राच्या घरी पोहचला भोंदू बाबाने तंत्र मंत्र विद्याला सुरुवात केली. या मंत्रांच्या उच्चाराने पैसे घेऊन येणारा मित्र गुंग होताच बाबाच्या सोबत आलेल्या व्यक्तीने २० लाखांची रक्कम घेऊन पोबारा झाला. काही क्षणात पैसे मिळतील असे सांगून बाबाही तिथून पळाला. मात्र, उशीर होऊनही पैसे न आल्याने संशय आल्याने बाहेर जाऊन पाहिल्यावर बाबा फरार झाल्याचे निदर्शनात आले. संबधित घटना बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार करताच पोलिसांनी तांत्रिक मदतीच्या आधारे बाबा आणि त्याच्या साथीदाराला ताब्यात घेत त्यांच्याकडून १९ लाखांची रक्कम हस्तगत केली. दोघांवर गुन्हा दाखल करून अटक केली असून अजून कुणाला फसविले आहे का ? याचा तपास पोलीस करत आहेत.

### बीड बस स्थानकाचे विदारक चित्र; बसस्थानकामुळे प्रवाशांचे मोठे हाल





दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात ज्या बीडचे नाव कायम चर्चेत असते. त्या बीडमध्ये मध्यवर्ती बसस्थानकाचे विदारक चित्र समोर आले आहे. नवीन होत असणाऱ्या बसस्थानकाचे काम अतिशय संत गतीने सुरू असल्याने, प्रवाशी नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. तर सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रवाशांना चिखल, दलदल आणि पाण्यातून रस्ता काढावा लागत आहे. त्यामुळे राजकारणाच्या गप्पा मारणाऱ्या नेत्यांनी अगोदर या कामाकडे लक्ष देऊन लवकरात लवकर संत गतीने सुरू असणारे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### लाच घेताना तांत्रिक अधिकारी व रोजगार सहाय्यकास अटक

दैनिक आपला विदर्भ


**वाशीम/प्रतिनिधी :** वडीलांच्या नावावर मंजूर झालेल्या विहिरीचे बांधकामाचे प्रमाणपत्र देण्यासाठी १५०० रुपयांचे लाच स्वीकारताना तांत्रिक अधिकारी व काजळंबा ग्रामपंचायतीचे रोजगार सहाय्यकास रंगेहात अटक करण्यात आली. सदर कारवाई वाशीम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने २५ जुलै रोजी वाशीम पंचायत समिती कार्यालय परिसरात करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील जांभरून परांडे येथील तक्रारदार आपल्या वडिलांच्या नावावर असलेल्या मंजूर विहिरीचे प्रमाणपत्र मागणीसाठी वाशीम पंचायत समितीमधील तांत्रिक अधिकारी मयूर अंबरलाल हुमने यांच्याकडे गेला असता, यावेळी सदर कामासाठी संबंधीत अधिकायांनी रोजगार सहाय्यकाकडे १५०० रुपये देण्याचे सांगितले. दरम्यान सदर घटनेबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. सदर तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा कारवाई करून तांत्रिक अधिकारी मयूर अंबरलाल हुमने व रोजगार सहाय्यक ऋषिकेश उत्तम उगले यांना २५ जुलै रोजी लाच रक्कम स्वीकारताना अटक केली. सदर आरोपीविरुद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कारवाई अमरावती परीक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक मारूती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक अलका गायकवाड, उपअधीक्षक जगदीश परदेशी,राहुल व्यवहारे, योगेश खोटे, विनोद अवगळे, रवींद्र घरत,नाविद शेख यांच्या पथकाने केली.

# लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही

## रूपाली चाकणकर रूपाली चाकणकर यांनी घेतली अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बारामती येथे भेट

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** बारामती मधील रिक्रेशन हॉल या ठिकाणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी भेट दिली आहे. यावेळी मार्गदर्शन केले. मागील दोन वर्षांपूर्वी देखील मी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. चांगले मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. गेल्या पंधरा दिवसापासून राज्यात अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संघटना कार्यक्रम घेत आहेत. २ हजार ५०० ते ३ हजार रक्तदाते या ठिकाणी रक्तदान करणार आहेत.महाराष्ट्रातील सर्वात भव्य दिव्य ही रक्तदान शिबिर आहे.मागील वेळी मी कोरोना कालावधीत आले होते, त्यावेळी जमावबंदी होती.त्यावेळी महाराष्ट्रात कोणताच कार्यक्रम होत नव्हता. त्यावेळी बारामतीत रक्तदानाचा कार्यक्रम झाला होता. बारामतीकर नशीबवान आहेत, शैक्षणिक औद्योगिक सर्व क्षेत्रात अजित पवार यांनी योगदान दिले आहे. बारामती बरोबर महाराष्ट्राचे नाव उज्वल होत आहे. अजित पवार यांनी अर्थमंत्री म्हणून अतिशय उत्तम अर्थसंकल्प मांडली आहे. अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना जाहीर केली, तेव्हा विरोधकांचे चेहरे पाहण्यालायक झाले होते. विरोधकांनी पहिल्या दिवसापासूनच टीका करायला सुरू केली होती. ही योजना फसवी आहे, निवडणुकीचा जुमला आहे. विरोधक एवढ्यावर थांबले नाहीत तर ते कोर्टात गेले. ही योजना फसवी आहे असं म्हणत होते, पण आपापल्या मतदारसंघात लाडक्या बहीण योजनेचे बॅनर लावत होते. गेले वर्षभर झालं ही योजना आज बंद उद्या बंद परवा बंद होईल, अशी त्यांना स्वप्न पडतात. आणि माध्यमांसमोर बोलतात की ही योजना बंद होईल. निवडणुकीत विरोधकांनी कितीही अमिष दाखवली, तरी त्यांना अजित पवारांनी आपल्याला शब्द दिला आहे, हे मतदारांना माहीत होतं ते शब्द पाळणारे आहेत. लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही.दीड हजार रुपये प्रति महिना महिलांना



देणार सन्मानाने देणार हे सरकार आहे. यामध्ये सरकारने पैसे आज पर्यंतची अशी कोणतीही योजना नाही की सरकारने पैसे दिल्यावर थेट महिलांच्या खात्यात जमा होतात. अतिशय पारदर्शकपणे ही योजना राबवली जाते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लाडक्या बहिणी महायुती सरकारच्या ठामपणे उभ्या राहतील, आणि ग्रामपंचायत पासून सर्वच निवडणुकात मोठे यश मिळेल.सर्व मंत्री गण आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. लोकसभा विधानसभेच्या अर्थात नेत्यांच्या निवडणुका झाल्या आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत एखाद्या व्यक्तीचा जीव वाचवणे, हे रक्तदात्याचे काम असतो. ते आपण पूर्ण करत आहोत. रक्तदान करताना रक्तदाता जात धर्म पाहत नाही. रक्ताचा रंग लाल आहे, आमच्या महिलांच्या गर्भाचा रंग लाल आहे, सृजनतेचा हा लाल रंग आहे. पवार यांनी कायम सर्व समानतेची भूमिका घेतली. येणाऱ्या काळात बारामतीकरांचे स्वप्न आहे. अजित पवार यांनी मुख्यमंत्री व्हाव. पण तुमच्या इतकेच महाराष्ट्रातील प्रत्येक कार्यकर्त्याचे ते स्वप्न आहे. सर्व कार्यकर्त्यांच्या आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, केवळ घोषणा देऊन ते स्वप्न पूर्ण होणार नाही. कार्यकर्ता म्हणून आपल्याला जबाबदारी निभवावी लागेल.

### 'या' कारणांसाठी घेता येणार वर्षातून महिनाभराची सुट्टी, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी राज्यसभेत मोठा निर्णय

नवी दिल्ली ; मोदी सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना आपल्या वृद्ध पालकांची काळजी घेण्यासाठी वर्षभरातून ३० दिवसांची रजा देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे तुम्ही जर सरकारी कर्मचारी असाल, आणि तुमच्या वृद्ध पालकांच्या आरोग्याची काळजी वाटत असेल, तसेच तुम्हाला कामाच्या व्यापामुळे त्यांना वेळ देता येत नसेल, तर आता तुमची चिंता मिटली आहे. कारण आता केंद्र सरकारी कर्मचारी त्यांच्या पालकांची काळजी घेण्यासाठी ३० दिवसांची रजा घेऊ शकतात. केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत या निर्णयाची माहिती दिली.

## अत्यावश्यक सेवेत असलेल्या रुग्णवाहिका चालकांना १८ महिन्यांपासून पगार नाही

### १०२ टोल फ्री रुग्णवाहिकेवरील चालकांचे बेमुदत उपोषण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अत्यावश्यक सेवेत असलेल्या शासकीय १०२ क्रमांकाच्या टोल फ्री रुग्णवाहिकेवरील कंत्राटी चालकांचे गेल्या १८ महिन्यांपासून पगार झाले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आता उपासमारीची वेळ आली आहे. वारंवार वरिष्ठांकडे मागणी करून देखील त्यांचा पगार होत नसल्याने जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिकेवर कार्यरत असलेले एकूण १७ रुग्णवाहिका चालक बुलढाण्यात गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत.पगारासह विविध मागण्या त्यांनी या निमित्ताने शासनाकडे केल्या आहेत, रुग्णवाहिका चालकांच्या उपोषणामुळे यंत्रणा प्रभावित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर उपोषणा संदर्भात उपोषण करते नवीन उमाळे यांनी माहिती दिली की मागील १८ महिन्यांपासून रुग्णवाहिका चालकांना पगार मिळाला नसल्याने त्यांच्या कुटुंबाचा दरवाजाचा निर्णय प्रश्न निर्माण झाला आहे. आर्थिक दृष्ट्या कुटुंब अडचणीत आले असून प्रचंड महागाईच काळात तब्बल १८ महिने पगार न झाल्याने सर्वांचे आर्थिक बजेट कोणी पडले असून




मानसिक संतुलन आहे. बिघडत चालले आहे अनेक समस्यांचा सामना रुग्णवाहिका चालकांना करावा लागत आहे अत्यावश्यक सेवेतील महत्त्वाचा घटक असलेल्या रुग्णवाहिका चालकांना तात्काळ वेतन द्यावे त्याचबरोबर पुढील वेतन नियमित करावी अशी मागणी रुग्णवाहिका-चलकाकडून करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र भारत गॅस वितरक संघटनेच्या कार्यकारी अध्यक्षपदी

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवक्ते महेश तपासे

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण शहरात १९८० पासून भारत गॅस वितरण करणाऱ्या गुरुकृपा गॅस कंपनीचे संचालक महेश तपासे यांची महाराष्ट्र भारत गॅस वितरक संघटनेच्या कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तपासे यांच्या या नियुक्तीबद्दल सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रीय भारत गॅस वितरक संघटनेचे अध्यक्ष कैलास दुधानी आणि महाराष्ट्राचे अध्यक्ष अविनाश शिंदे यांनी महेश तपासे यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला किशोर सोडा, अतुल शहा, अरुण वेटेकर, उषा पूनावाला, सरोज अहिरे आणि शिरीष वारंगे आदी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अनुमोदन दिले.





महाराष्ट्रातील गॅसधारकांना वितरकांमार्फत उत्कृष्ट आणि जलद सेवा मिळण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी महेश तपासे यांनी या नियुक्तीवर व्यक्त केली. तसेच कोविड काळात संपूर्ण लॉकडाऊन असतानाही त्यावेळी गॅसवितरकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता गॅसधारकांना सिलेंडर पुरवठा केल्याची आठवणही तपासे यांनी करून दिली. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारतील प्रधानमंत्री उज्वला योजनेअंतर्गत भरीव अशी कामगिरी महाराष्ट्रातील गॅस वितरकांनी केल्याबद्दल देशपातळीवरही या संघटनेचे मोठे कौतुक झाले. महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी भगिनींना सरकारी धोरणानुसार गॅस वितरणचे काम वितरक बांधवांनी मोठ्या उत्साहाने केले आणि त्याचा फायदा लाखो लाडक्या भगिनींना झाल्याचेही ते म्हणाले. त्याशिवाय गॅस पाईपलाईनमुळे गॅस सिलेंडरला आता फक्त शहरातील अविकसित भाग आणि राज्याचा ग्रामीण भाग येथेच मागणी असून परिणामी वितरक बांधवांसमोर मोठ्या आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तर आता गॅसधारकांनाही केवायसी सोबतच सिलेंडर घेताना आपला नोंदणीकृत मोबाईलचा ओटीपी संगणक प्रणालीमध्ये नोंद करणे अत्यावश्यक आणि बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्राहकांनी पाच वर्षात एकदा त्यांची रबर ट्यूब बदलावी आणि कायद्याने मान्य असलेली आवश्यक तपासणी वितरकांच्या अधिकृत मेकॅनिककडून करून घ्यावी जेणेकरून अपघात टाळण्यास मदत होईल. गॅस गळतीच्या वेळी ग्राहकांनी काय तात्काळ उपाय करावे यासाठी वेळोवेळी महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजन करणार असल्याचेही महेश तपासे यांनी सांगितले.

### उज्ज्वल निकम यांच्या बायोपिकमध्ये अभिनेता राजकुमार राव झळकणार

**मुंबई/प्रतिनिधी :** ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम आता खासदार उज्ज्वल निकम म्हणून ओळखले जाणार आहेत. उज्वल निकम यांची नुकतीच राज्यसभेवर निवड करण्यात आली आहे. राष्ट्रपती कोट्यातून उज्ज्वल निकमांना राज्यसभेची खासदारकी देण्यात आली आहे. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत निकमांचा उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून पराभव झाला होता. तेव्हा त्यांनी भाजपमधून निवडणूक लढवली होती. अशातच देशातील काही सुप्रसिद्ध सरकारी वकिलांच्या यादीत समाविष्ट होणाऱ्या उज्ज्वल निकमांवर आता बायोपिक येणार आहे. या बायोपिकची सोशल मीडियावर बरीच चर्चा रंगल्याचं पाहायला मिळत आहे.

सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या आयुष्यावर आता सिनेमा येणार आहे. या बायोपिकची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. हा सिनेमा मॅडॉक फिल्म्स निर्मित करत आहे आणि दिग्दर्शन पाताल लोक, स्कूप सारख्या लोकप्रिय वेब सीरिजचं कर्तेधर्ते दिग्दर्शक अविनाश अरुण करत आहेत. उज्वल निकम यांच्या बायोपिकसाठी बॉलिवूड अभिनेता राजकुमार रावला कास्ट करण्यात आलं आहे.

## जिल्हा कॉन्ट्रक्टर्स वेलफेअर असोसिएशची शासना विरोधात निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्हयातील शासकीय काम करणारे ठेकेदाराणी आज शासनाच्या विरोधात निदर्शने केली. गेल्या वर्षी सा.बां. विभाग, आदिवासी विकास विभाग, जलजीवन मिशन, ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, जलसंधारण विभाग तसेच जिल्हा नियोजन समिती मार्फत प्रचंड प्रमाणात कामे काढली गेली. परंतु शासनाने ज्या प्रमाणात कामे काढली त्याप्रमाणात निधीचे नियोजन केले नाही. त्यामुळे गेल्या वर्षभरात ठेकेदारांच्या वाटयाला केलेल्या कामाच्या देयकांपोटी अत्यल्प निधी वितरीत केला गेला त्यामुळे सर्व ठेकेदार प्रचंड आर्थिक अडचणीत आलेले आहेत.

सर्व विभाग मिळुन आज पर्यंत १२ हजार ५०० कोटीची देयके प्रलंबीत आहेत व बाकी कामे प्रगती पथावर आहेत. काही महिन्यांपासुन कोणत्याही कामापोटी ठेकेदारांना कुठलेही देयके प्राप्त झालेले नाही. त्यामुळे ठेकेदार प्रचंड आर्थिक अडचणीत आलेले आहेत यामुळे व्यवसायावर अवलंबुन असणारे मजुर, टेक्निकल स्टाफ, अकाऊंट स्टाफ, खडी क्रशर, पुरवठादार, पेट्रोल पंप, बँकेचे हप्ते व व्याज या सर्व स्तरावर ठेकेदार प्रचंड अडचणीत आले आहेत.

तरी याआर्थिक चक्रातून बाहेर येण्यासाठी शासनाने लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन द्यावा जेणेकरून सर्वांचे उदयोग बंद पडुन उपासमारीची वेळ येणार नाही. शासनाने ठेकेदारांना आर्थिक



अडचणीतुन बाहेर पडण्याचा मार्ग उपलब्ध करुन द्यावा अन्यथा ठेकेदारांना कर्ज बाजारी होण्याची वेळ येईल व त्यामुळे नाईलाजास्तव कामे बंद पडुन सर्व ठेकेदारांना निधी मिळण्यासाठी साखळी उपोषण व कामबंद आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. असे यावेळी सांगण्यात आले.

# आज जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'एक पेड माँ के नाम' मोहीम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या एक पेड माँ के नाम या महत्वाकांक्षी वृक्षारोपण मोहिमेच्या अनुषंगाने शनिवारी (दि. २६ जुलै ) जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमधून माता पालकांच्या हस्ते सार्वत्रिक वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात एकाच दिवशी हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शालेय शिक्षणाच्या माध्यमातून एकात्मिक पर्यावरण विषयक जागरूकता




सातत्यपूर्णपणे विद्यार्थ्यांमध्ये टिकवून ठेवून नवोपक्रमशील असे विशिष्ट कौशल्ये आणि क्षमता विकसित करून उत्कृष्ट, उत्पादनशील नागरिक निर्माण करणे अपेक्षित आहे. एकविसाव्या शतकातील कौशल्ये, जीवनातील अनुभवांवर आधारीत पर्यावरण शिक्षण जीवनाच्या सुरुवातीच्या काळातच देणे अत्यंत गरजेचे आहे. यापार्श्वभूमीवर कृषी लागवडीच्या हंगामात सुसंगतपणे सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यासाठी समाजिक वनीकरण विभागाच्या शासकीय रोपवाटिका,तसेच विविध विभागाकडून विकसित केलेल्या रोपवाटिका जसे वनविभाग, फलोत्पादन विभाग,शहरी स्थानिक संस्था,महामंडळे,इत्यादीच्या रोपवाटिका मधून सर्व शाळांना रोपे उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी यापूर्वीच निर्देश दिलेले आहेत.

या मोहिमेसाठी दिनांक २६ जुलै रोजी सर्व शाळेतील विद्यार्थ्यांच्या माता/महिला पालक यांना आमंत्रित करून शाळा/ महाविद्यालये परिसर येथे वृक्षारोपण केले जाणार आहे. तसेच शाळेमध्ये पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास नजीकच्या विविध स्थळांची जसे उद्याने, सार्वजनिक जागा इत्यादी वृक्षारोपण स्थळांची निश्चिती करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शाळा परिसरात जागा उपलब्ध नसल्यास विद्यार्थ्यांनी सदर उपक्रम स्वतःच्या राहत्या घरी/ परिसरामध्ये अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थी,विद्यार्थ्यांची माता/महिला पालक यांचेसह रोप लावत असतानाचे छायाचित्रे मोबाईल द्वारे संकलित करून भारत सरकारच्या इकोक्लब पोर्टल (https://ecoclubs.education.gov.in) वर अपलोड करण्यात येणार आहेत. विदयार्थ्यांनी लावलेल्या रोपांची निगा राखुन त्यांचे संवर्धन करण्याबाबतही विदयार्थ्यांना प्रोत्साहित करणे या उपक्रमाच्या माध्यमातून अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे सर्व शाळांमधून इको क्लब स्थापित करणे सुध्दा अपेक्षित आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय संस्कारक्षम असलेल्या या उपक्रमांत जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्था संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी तसेच त्यांच्या माता पालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी केले आहे.

## विविध वृत्त...

### डाक सेवांमध्ये डिजिटल क्रांती; आय.टी. २.0 अप्लिकेशनचे कार्यान्वयन सोमवारी जिल्ह्यातील डाक सेवा बंद

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभाग आपल्या सेवा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी 'आय.टी. २.०' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत एपीटी अप्लिकेशन ही नवीन डिजिटल प्रणाली कार्यान्वित करत आहे. या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे डाक व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार असून, यामुळे पोस्ट ऑफिसमधील सेवा आणखी सक्षम होणार आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालये व उपडाकघरांमध्ये ही प्रणाली मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ पासून लागू करण्यात येत आहे. या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या डेटाच्या स्थलांतराची प्रक्रिया सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याने त्या दिवशी (दि. ४ ऑगस्ट रोजी) बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार करता येणार नाहीत. त्यामुळे महत्त्वाची कामे ४ ऑगस्टपूर्वीच पूर्ण करावीत, जेणेकरून व्यवहारात अडथळा येणार नाही, अशी माहिती अधिक्षक डाकघर, बुलढाणा यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

### अकोला महानगरपालिकेत एआयएमचे मनपा आयुक्त यांच्या केबिनच्या वर चढून संघर्ष आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला महानगरपालिकेत एआयएमने आंदोलन केले असून मनपा आयुक्त सुनील लहाने यांच्या कक्षाच्या वर चढत हे संघर्ष आंदोलन करण्यात आल आहे. तर अकोला शहरातल्या प्रभाग क्रमांक १, २, तसेच ७ या स्लम एरियामध्ये सरकारने जीआर २०१७ च्या नुसार पट्टे वाटप आणि घरकुल वाटप केले नाही. तर ते तातडीने वाटप करण्यात यावे, या मागणीसाठी आज एमआयएमने हे संघर्ष आंदोलन केले आहे. तर काहीनी मनपा आयुक्त यांच्या कार्यालयासमोर बसून ठिय्या दिला आहे. आणि जोपर्यंत मनपा आयुक्त येऊन चर्चा करत नाही, तोपर्यंत इथून उठणार नाही. असा इशारा या ठिकाणी आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

### काळ्या फिती लावत कंत्राटदारांचे बुलढाणा जिल्हा परिषदे समोर आंदोलन






**बुलढाणा/प्रतिनिधी :** सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी येथील सरकारी कंत्राटदार हर्षल पाटील यांनी गळ्याला दोरी लावून आत्महत्या केल्यानंतर कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून कंत्राटदारांची बिल दिली जात नसल्याने कंत्राटदार संघटना आणि कंत्राटदार आक्रमक झाले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणी पुरवठा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावत बुलढाणा जिल्हा परिषदे समोर आंदोलन केले आहे. यावेळी सरकारकडून प्रलंबित देयके देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणी पुरवठा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

### १०२ मेळावे, ५७ हजार नोंदणी, २७ हजार युवकांना एकाच दिवशी रोजगार!

**अकोला/प्रतिनिधी :** बेरोजगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यातच खासगी कंपन्या, संस्था, शासकीय मंडळे आधी ठिकाणी योग्य उमेदवार मिळत नसल्याने असंख्य जागा रिक्त राहतात.त्यावर उपाय म्हणून कौशल्य, रोजगार व नाविन्यता विभागाने राज्यव्यापी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे घेण्यात आले. राज्यातील १०२ मेळाव्यांमध्ये विक्रमी ५७ हजार तरुणांनी नोंदणी केली, तर २७ हजार तरुणांना एकच दिवशी रोजगार मिळाला आहे. अकोला येथे आयोजित मेळाव्यामध्ये १०७ उमेदवारांची निवड झाली.

# सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचा जिल्हा दौरा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील हे शुक्रवार व शनिवार दि. २५ व २६ जुलै २०२५ रोजी शेगाव व खामगाव जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. २५ जुलै रोजी रात्री ९.१५ आनंद विसावा, शेगाव जि.बुलढाणा येथे आगमन व राखीव. शनिवार दि.२६ जुलै २०२५ रोजी सकाळी ७ वाजता श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन. सकाळी ७.३० वाजता आनंद विहार येथे कार्यकर्त्यांशी भेट. सकाळी ९.३० वाजता खामगावकडे प्रयाण, सकाळी १० वाजता ब्रिटिश कालीन विश्रामगृह, खामगाव येथे सहकार विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत आढावा बैठक. सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. सकाळी ११.४५ वाजता शहर पोलीस स्टेशन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी १२ वाजता टॉवर चौक येथे महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन, दुपारी १२.१५ वाजता सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट व राखीव.

दुपारी १.१५ वाजता एकबोटे चौक, अग्रसेन चौक येथे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष जनसंपर्क कार्यालयास भेट. दुपारी १.३० वाजता शिवाजी महाराज स्टेडीअम समोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्धाटन. दुपारी १.४० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुड पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन. दुपारी १.५० वाजता केशवराव कापले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २ वाजता मस्तान चौक येथील मस्तानशाह बाबा दर्गा येथे चादर चढविणे, दुपारी २.१५ वाजता मोहन चौक येथे देवेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २.३० वाजता सुटाळा येथे छत्रपती संभाजी महाराज व संताजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी २.४५ वाजता घाटपुरीनाका येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्धाटन, दुपारी ३ वाजता घाटपुरी ग्रामपंचायत समोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन. दुपारी ३.१५ वाजता जळका भडंग गाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्धाटन. दुपारी ४ वाजता भारत लॉन येथे शेतकरी मेळावा व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता पिंपळगाव राजा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन, सायंकाळी ७.३० वाजता राखीव व रात्री ८ वाजता नांदुरा रेल्वेस्टेशनकडे प्रयाण व आगमन. रात्री ९.४५ वाजता नांदुरा रेल्वे स्थानकावरुन मुंबईकडे प्रयाण करतील.

# २४ तासात गुण्याचा छडा लावणारे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी नरेंद्र पूंड यांचा एसपी कडून गौरव

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी



**यवतमाळ :** सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्याचे तंतोतंतपालन करणारे पोलीस पोहवा नरेंद्र पूंड यांनी २४ तासातच गंभीर गुन्ह्याचा तपास करून इतर पोलिसांसाठी प्रेरणा दायी ठरले आहे. उमरखेड पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा क्रमांक २०२५/२५ कलम ११८(१),३५२,३५१(२)(३) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे दाखल गुन्ह्याचा तपास पुर्ण करून. आरोपी विरुद्ध सबळ पुरावा पोहवा नरेंद्र पूंड व (रायटर) संदीप जाधव यांनी हस्तगत करून सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र/ २४ तासाच्या आत विद्यमान न्यायालयात दाखल करून इतर पोलिसांना तपास करण्याची एक वेगळीच दिशा निर्माण करून पोलीस खात्यात आपले नाव लौकिक केले आहे. त्याच अनुषंगाने यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पोलीस हवालदार नरेंद्र पुंड यांचे कौतुक करत प्रशंसापत्र प्रदान करून गौरवण्यात आले आहे. पोलीस खात्यात उल्लेखनीय कामगिरी व प्रशंसनीय कार्य केले म्हणून एस पी कुमारचिंता यांच्या हस्ते पोहवा नरेंद्र पूंड यांचा सत्कार करण्यात आला. व आपण भविष्यात सुद्धा अशाच प्रकारची उल्लेखनीय कामगिरी करून यवतमाळ जिल्हा पोलिस दलाची प्रतिमा उज्वल कराल त्याकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

## उडत्या विमानात बाळाचा जन्म, एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात झाली प्रसूती

**मुंबई /प्रतिनिधी :** बुधवारी परदेशातून मुंबईला येणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात एक असाधारण आणि भावनिक घटना घडली. मस्कतहून मुंबईला येणाऱ्या विमानात एका थायलंड महिलेने हवेतच एका निरोगी बाळाला जन्म दिला. ही दुर्मिळ घटना केवळ मानवतेचे प्रतीक बनली नाही तर विमान कर्मचाऱ्यांच्या तत्परतेचे आणि प्रशिक्षणाचे उदाहरणही मांडले.

माहितीनुसार, महिलेला प्रसूती वेदना जाणवू लागताच, विमानातील केबिन क्रूने त्यांचे प्रशिक्षित वैद्यकीय कसब दाखवले आणि त्वरित मदत केली. या दरम्यान, विमानात उपस्थित असलेल्या एका परिचारिकेनेही सहकार्य केले.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना; शेतकऱ्यांनो, ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० व्या हप्त्याचा लाभ लवकरच वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार ९९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ४३३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषि उपसंचालक अनुराधा गांवडे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता परदेश शिष्यवृत्ती; १ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी सन २०२५-२६ शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अर्ज मागविण्यासाठी अल्पसंख्यांक विभागाने मंजूरी दिली आहे. सन २०२५-२६ वर्षासाठी जागा भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडून दि. १८ जुलै २०२५ पासून प्रत्यक्षरित्या व ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ताज्या घडामोडीमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपुर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दि. १ ऑगस्ट २०२५ पर्यंत https://fs.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरुन त्याची प्रिंट पोस्टाने किंवा समक्ष आयुक्त, समाज कल्याण, ३, चर्च पथ, पुणे ४११००१ येथे सादर करावी, असे अवाहन पुणे समाज कल्याण विभागाचे आयुक्तांनी केले आहे.

योजनेच्या अटी व शर्ती: विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा, विद्यार्थी अल्पसंख्याक समुदायातील घटकातील असावा, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असावी. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त नसावे. याबाबत सक्षम प्राधिकारी तथा तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला देण्यात यावा. (विवाहित महिला उमेदवारांनी पतीकडील कुटुंबाचे एकत्रीत वार्षीक उत्पन्नाचा दाखला देणे आवश्यक आहे. जर विवाहित महिला उमेदवार विधवा, घटस्फोटीता असून वडीलांकडे वास्तव्यास असल्यास महिला उमेदवाराने वडीलांकडील कुटुंबाच्या उत्पन्नानुसार अर्ज केल्यास तसे कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.) परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे (दिनांकानुसार) कालावधीचाच एमबीए अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील. भारतीय आयुर्विज्ञान परीषदेच्या संकेतस्थळावरील एमडी व एमएस अभ्यासक्रमच प्रवेशासाठी पात्र असतील.

शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० टक्के जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.



जर त्याप्रमाणात मुलींचे प्रवेश अर्ज प्राप्त न झाल्यास त्या जागेवर मुलांची गुणवत्तेनुसार निवड करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटूंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटूंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत २०० च्या आत असावी. तथापी २०० मधील (The University of South Wales (UNSW Sydney), Australia ), हे विद्यापीठ सदरील योजनेतुन वगळण्यात येत आहेत. शासनाने सर्व विभागाच्या परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषामध्ये समानता आणण्या करीता सर्वकष धोरण ठरविले आहे. त्यामुळे नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार तयार केलेल्या सर्वकष नियमावलीचे सर्व विभागांनी पालन करणे अपेक्षित असल्याने नियोजन विभागाने घेतलेला शासन निर्णय अंतिम असेल. सदर योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छित असलेल्या विद्यार्थ्यास पुढील सत्राचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून त्यासाठी शैक्षणीक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

योजनेतील लाभाचे स्वरुप : परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीपासून लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी, अभ्यासक्रमासाठी नजिकच्या मार्गानी Economy Class विमान प्रवास भाडे, (परतीच्या प्रवासासह) निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा यावरील विद्यार्थ्याने प्रत्यक्ष केलेला खर्च विहीत केलेल्या वित्तीय मर्यादेत मूळ शुल्क भरणा पावती, प्रवासाचे मुळ तिकिट, मुळ बोर्डिंग पास, परतीच्या प्रवासाचे तिकिट इ. तपासून विद्यार्थ्याच्या बँक खात्यावर भारतीय रुपयामध्ये प्रतिपूर्ती केली जाईल. सर्वसाधारण पदव्युत्तर पदवीसाठी २ वर्ष किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल त्या अभ्यासक्रमासाठी नजिकच्या मार्गाने Economy Class विमान भाडे, परतीच्या भाड्यासह, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा यासह शाखा/अभ्यासक्रम निहाय मार्गदर्शक तरतुदीनुसार परदेशी शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल.